# थोडक्यात पण महत्वाचे



## सुद्रिकेश्वर महाराज मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त सन्मान

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) :श्रीगोंदा तालुक्यातील पारगाव सुद्रिक येथे सुद्रिकेश्वर महाराज मंदिरात सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त प्रहार दिव्यांग संघटना व प्रेरणा अपंग सेवा संस्था यांच्या वतीने अध्यक्ष राजेंद्र पोकळे यांच्या हस्ते महाराजांचा छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा व शाल देऊन सन्मान करण्यात येत आहे. आज काल्याच्या कीर्तनानिमित्तही महाराजांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी डॉ. सोमनाथ देवकाते, सिराज शेख, सुरेश गलांडे, मच्छिंद्र पाटोळे, शशिकांत आंधळकर, बाळासाहेब पिपाडा, अमोल भागवत, रियाज शेख, राजेंद्र कोठारे, धनंजय दांडेकर, महादू पवार, बाप्पू हिरवे चौपदार, गंगाराम मडके चौपदार, बाळासाहेब हिरवे, बाबासाहेब घोडके, नारायण रेपाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## गुरुकुलचा समर्थ शेळके बारावी सीबीएसई बोर्डामध्ये तालुक्यातून प्रथम




जुन्नर तालुका (स. गांवकरी) : समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ गुरुकुल,बेल्हे-बांगरवाडी या सीबीएसई मान्यताप्राप्त इंग्रजी माध्यमाच्या शाळेचा इयत्ता बारावी CBSE बोर्ड परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून विद्यालयाने उत्कृष्ट यश संपादन केल्याची माहिती प्राचार्य सतीश कुऱ्हे यांनी दिली. या निकालामध्ये समर्थ विवेक शेळके याने ९०.६० टक्के गुण मिळवून वाणिज्य शाखेत जुन्नर व आंबेगाव तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला.तसेचविज्ञान शाखेत कु.श्वेता बाबाजी बांगर हिने ७८.२० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला.इतर गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये रिहान जमीर पटेल याने ७७.२० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक, सार्थक जनार्धन घाडगे याने ६९.८० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक श्वेता संदीप मटाले हिने ६९.४० टक्के गुण मिळवून चतुर्थ क्रमांक,कु.स्नेहा महेंद्र रोकडे हिने ६८.८० टक्के गुणांसह पाचवा क्रमांक तर चि.तन्मय सुरेश गलांडे याने ६७.४० टक्के गुण मिळवून सहावा क्रमांक पटकावल्याची माहिती समर्थ गुरुकुलचे प्राचार्य सतीश कु-हे यांनी दिली.

## विवाहितेच्या आत्महत्ये प्रकरणी एल्गार कष्टकरी संघटनेचे धरणे आंदोलन



पालघर (स. गांवकरी) : मोखाड्यातील बोटोशी पैकी मरकटवाडी येथील विवाहिता शोभा कामडी (20) हिने शेतीवरील घरात गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. या प्रकरणी मोखाडा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे. मात्र, या महिलेला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी तीच्या सासरच्यांवर गुन्हा दाखल करावा, या मागणीसाठी एल्गार कष्टकरी संघटनेने मोखाडा पोलीस ठाण्यात धरणे आंदोलन केले आहे. मोखाड्यातील मरकटवाडी येथील शोभा शंकर कामडी या विवाहितेने शेतावरच्या घरात 1 मे रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. या घटनेप्रकरणी मोखाडा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे. मात्र, तीला सासरच्या लोकांनी आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी मोखाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करावी, अशी मागणी तीच्या माहेरच्यांनी केली आहे. तसा तक्रारी अर्ज पोलीस ठाण्यात दाखल केला आहे. मोखाडा पोलीसांनी तीच्या सासरच्यांवर आत्महत्येस प्रवृत्त केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करावा, या मागणीसाठी एल्गार कष्टकरी संघटनेचे अध्यक्ष भगवान मधे यांच्या नेतृत्वाखाली रणरणत्या उन्हात मोखाडा पोलीस ठाण्यात धरणे आंदोलन केले आहे. दरम्यान, या घटने प्रकरणी अकस्मात मृत्युची नोंद केली असून तपासानंतर पुढील गुन्हा नोंद करण्यात येणार असल्याची माहीती मोखाडा पोलीसांनी माध्यमांना दिली आहे.

## ग्रामीण महाराष्ट्राला जागतिक व्यासपीठ देणारं भव्य प्रदर्शन



मुंबई (स. गांवकरी) : बीकेसी येथे सुरू असलेलं 'महालक्ष्मी सरस २०२६' यंदा आपल्या भव्य उभारणी, आधुनिक सादरीकरण आणि जागतिक दर्जाच्या संकल्पनेमुळे विशेष चर्चेत आलं आहे. महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागांतर्गत 'उमेद – महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान'च्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या या प्रदर्शनाची संकल्पना आणि डिझाईननबाबत दीपाली डिझाईन्सचे सर्वेसर्वा विनय मित्तल यांनी माहिती दिली. यंदाच्या प्रदर्शनात ४० मीटर x ७ मीटरची विशाल एलईडी ॲनामॉर्फिक स्क्रीन, आकर्षक लाईटिंग, वातानुकूलित फूड कोर्ट आणि ६० हून अधिक कंटेनर्सच्या माध्यमातून उभारलेला भव्य सेट हे प्रमुख आकर्षण ठरत आहेत. जवळपास १५ हजार किलो वजनाच्या कंटेनर्सचा वापर करून साकारलेला हा सेट ग्रामीण महिलांच्या उत्पादनांचा "लोकल टू ग्लोबल" प्रवास दर्शवतो. संपूर्ण उभारणीसाठी १ लाख १८ हजारांहून अधिक मनुष्यतास खर्च करण्यात आले असून, महाराष्ट्रातील कलाकारांनी हजारो तास मेहनत घेत ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवली आहे. विनय मित्तल यांनी सांगितले की, "यंदाचं महालक्ष्मी सरस हे केवळ प्रदर्शन नाही, तर ग्रामीण महाराष्ट्राच्या कर्तृत्वाचा उत्सव आहे. महिलांच्या हातातील कला, त्यांची मेहनत आणि 'लखपती दीदी' बनण्याचा प्रवास जागतिक स्तरावर पोहोचवण्याचा हा प्रयत्न आहे." ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून यंदाचं प्रदर्शन अधिक भव्य आणि अनुभवात्मक स्वरूपात साकारण्यात आलं आहे. प्रदर्शनामध्ये छत्रपती शिवाजी महाराज, विठ्ठल-रुक्मिणी, महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या विचारांना विशेष स्थान देण्यात आलं आहे. महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त महिला शिक्षण आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेशही प्रभावीपणे मांडण्यात आला आहे. एकूणच, 'महालक्ष्मी सरस २०२६' हे प्रदर्शन केवळ खरेदी-विक्रीपुरतं मर्यादित न राहता ग्रामीण महाराष्ट्र, महिला सक्षमीकरण, कला-संस्कृती आणि आधुनिकतेचा संगम घडवणारं प्रेरणादायी व्यासपीठ ठरत आहे.

# आजोबांच्या घरफोडीचा छडा लावण्यात ओतूर पोलीसांना यश

### आरोपी अटकेत, १००% मुद्देमाल जप्त

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

दि:- ०१/०५/२०२६ ते दि:- ०७/०५/२०२६ रोजी मौजे नेतवड,कुटे मळा ता:-जुन्नर,पुणे येथील बजाबा महादु कुटे वय ९५ वर्षे यांनी त्यांच्या पत्नीचे जपुन ठेवलेले दागीने त्यांच्या घराच्या पोटमाळ्यातुन खाली उतरून घरामध्ये असलेल्या पेटीचा कडी कोयंडा तोडुन पेटीत असलेले १)१,८०,०००/- तीन तोळे वजनाचेमनीमंगळसुत्र २) १,५०,००० रू किमतीचे अडीच तोळे वजनाचे ६ सोन्याचे पान व १ पुतळा,३) ३०,०००रू किमतीची अर्धा तोळयाची सोन्याची नथ ४) ६०,००० रू किमतीची १ तोळा वजनाची सोन्याच्या पेटया असा एकुण ४,२०,००० रू किमतीचे सात तोळे सोन्याचे दागीने अज्ञात इसमाने घरफोडी चोरी करून चोरून नेले असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले होते.सदरबाब तान्हाजी बजाबा कुटे वय-५६ वर्षे रा:-नेतवड कुटेमळा ता:- जुन्नर यांनी दि:- ११/०५/२०२६ रोजी ओतूर पोलीस स्टेशनला तकार दिल्याने या प्रमाणे अज्ञात इसमाचे विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदरच्या गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिक्षक युवराज जाधव यांच्या कडे देण्यात आला आहे.

वरीलप्रमाणे गुन्हा दाखल केल्यानंतर ओतूर पोलीसांनी गुन्हयाचा सखोल तपास केला असता सदरचा गुन्हा फिर्यादी यांच्या घराच्या बाजुला राहण्यास असलेला अभिषेक खंडु कुटे वय-३२ वर्षे सध्या रा:- टिटवाळा ठाणे मुळ रा:-नेतवड कुटेमळा ता:-जुन्नर याने केला असल्याचे तपासात निष्पन्न झाले.सदरच्या आरोपीस दि:- १३/०५/२०२६ रोजी अटक करण्यात आले असुन अभिषेक कुटे याच्याकडे चौकशी केली असता त्याने गुन्हयाची कबुली दिली असुन सदरच्या आरोपीने चोरी केलेले तीन तोळे वजनाचे मनीमंगळसुत्र,अडीच तोळे वजनाचे ६ सोन्याचे पान व १ पुतळा,अर्धा तोळयाची सोन्याची नथ व १ तोळा वजनाची सोन्याच्या दोन पेटया असे एकुण ४,२०,००० रू किमतीचे सात तोळे वजनाचे सोन्याचे सर्व दागीने जप्त करण्यात ओतूर पोलीसांना यश आले आहे.



ओतूर पोलीसांनी केलेल्या कामगीरीचे सर्व स्तरातुन कौतुक होत असुन फिर्यादी यांचे चोरी केलेले दागीने मिळुन आल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले आहे. नागरीकांनी त्यांच्याकडे असलेल्या मौल्यवान दागीने, रोख रक्कम सुरक्षीत ठिकाणी ठेवली पाहीजे व ग्रामपंचायत मार्फत जास्तीत जास्त सी.सी. टी.व्ही. कॅमेरे बसवले गेले पाहीजेत अशा प्रकारचे आवाहन ओतूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे यांनी केले आहे.

सदरची कारवाई संदिपसिंह गिल,पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण,रमेश चोपडे,अप्पर पोलीस अधीक्षक पुणे,धनंजय पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी जुन्नर विभाग जुन्नर यांचे मार्गदर्शनाखाली ओतूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि ज्ञानेश्वर बाजगीरे, पोलीस उपनिरीक्षक युवराज जाधव, पो.हवा नरेंद्र गोराणे, पो.हवा. बाळशिराम भवारी, पो.कॉ.विशाल गोडसे,पो.कॉ. आशिष जगताप,पो. कॉ.योगेश उकिर्डे यांनी केली आहे.

## २५ मे रोजी कुकडीचे आवर्तन सुटणार : आ. विक्रम पाचपुते

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

'एल निनो'च्या प्रभावामुळे निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर अनेक धरणांतील पाणी पिण्यासाठी आरक्षित करण्यात आले आहे. अशा परिस्थितीत कुकडीचे पाणी सुटण्याची शक्यता कमी असतानाही श्रीगोंदा तालुक्याचे आमदार विक्रमसिंह पाचपुते यांच्या आग्रही पाठपुराव्यामुळे अखेर २५ मे २०२६ रोजी कुकडी धरणातून उन्हाळी दुसरे आवर्तन सोडण्याचा निर्णय जलसंपदा विभागाने घेतला आहे. अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी हा निर्णय घेतल्याची माहिती आमदार पाचपुते यांनी दिली. या निर्णयामुळे श्रीगोंदा तालुक्यातील लाभक्षेत्रातील पिकांना तसेच पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नाला मोठा दिलासा मिळणार आहे. सध्या कुकडी प्रकल्पातील धरणांमध्ये सुमारे १७.६७ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. उपलब्ध साठा मर्यादित असला तरी तीव्र उन्हाळा आणि पिकांची गरज लक्षात घेऊन सिंचन व पिण्यासाठी पाणी सोडण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले.



पत्रकारांशी संवाद साधताना आमदार विक्रम पाचपुते यांनी कुकडीचे आवर्तन सुरू करण्याच्या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले.

## कनाशीत पेट्रोल-डिझेलचा तीव्र तुटवडा

### शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे सर्वसामान्य जनता हैराण

कळवण : (स. गांवकरी)

कळवण तालुक्यातील आदिवासी व दुर्गम भागातील कनाशी गावासह परिसरात गेल्या आठवडाभरापासून पेट्रोल व डिझेलचा तीव्र तुटवडा निर्माण झाला आहे. शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे व पुरवठा साखळीतील नियोजनशून्यतेमुळे सर्वसामान्य जनतेला मोठ्या यातना भोगाव्या लागत आहेत. शेतीची कामे, रुग्णसेवा व दैनंदिन वाहतूक पूर्णपणे ठप्प होण्याच्या मार्गावर आहे.



पेट्रोल पंपांवर 'पेट्रोल-डिझेल संपले' अशा पाट्या लागल्या आहेत. ज्या पंपावर थोडाफार साठा आहे, तिथे वाहनांच्या 2 ते 3 किमी लांब रांगा लागल्या आहेत. 2 लिटरसाठी 4 तास ताटकळत उभे राहावे लागत असल्याने नागरिक संतप्त झाले आहेत. अनेकांना रिकाम्या हाताने परतावे लागत आहे. सध्या रब्बी हंगामाची लगबग सुरू आहे. ट्रॅक्टर व पंपासाठी डिझेल मिळत नसल्याने शेतकऱ्यांची मशागतीची कामे खोळंबली आहेत. "डिझेलअभावी शेतात नांगरणी बंद आहे. वेळेवर पेरणी नाही झाली तर हातचे पीक जाईल," अशी व्यथा शेतकरी संजय गावित यांनी मांडली. स्थानिक नागरिकांचा आरोप आहे की शासनाने पुरवठा कंपन्या व वितरक यांच्यात समन्वय न ठेवल्याने ही कृत्रिम टंचाई निर्माण झाली आहे. वाहतूकदारांचा संप, डेपोतून कमी पुरवठा व ऐन हंगामात नियोजनाचा अभाव यामुळे ग्रामीण भागाला मोठा फटका बसत आहे. "शहरात थोडीफार व्यवस्था होते, पण आदिवासी भागाकडे कायमच दुर्लक्ष केले जाते. शासनाच्या चुकीच्या धोरणाची किंमत आम्हा गरीब जनतेला मोजावी लागत आहे," अशी संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते शांताराम देशमुख यांनी दिली. या पार्श्वभूमीवर नागकरिकाकडून तहसिलदार व पुरवठा अधिकाऱ्यांनी तातडीने इंधन पुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली आहे.

## धर्मवीर संभाजी महाराज वीर पुरुष होते : एस पी बघेल

आग्रा : (स. गांवकरी)

धर्मवीर संभाजी महाराज हे वीर पुरुष, पराक्रमी योद्धे होते. त्यांनी प्राणाची आहुती देत हिंदवी स्वराज्याचे रक्षण केले. आग्रा येथील लाल किल्ल्यात छत्रपती शिवाजी महाराजांसोबत छत्रपती संभाजी महाराजांना कैद करण्यात आले होते इतिहास सर्वांना माहिती आहे. आता आग्रा मध्ये इतिहास बदलत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे मोठे स्मारक बनत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी होत आहे. धर्मवीर संभाजी महाराज यांचे आज आग्रा मध्ये पहिल्यांदी जयंती साजरी झाल्याचा आनंद होत असल्याचे केंद्रीय पंचायत राजमंत्री एस पी बघेल यांनी केले. आग्रा येथील प्राचीन हनुमान राम मंदिर येथे छावा भारत क्रांती मिशन याच्या वतीने धर्मवीर संभाजी महाराज राष्ट्रीय जन्मोत्सव सोहळा संपन्न झाला. नाशिक ते आग्रा राष्ट्रीय गौरव यात्रा राष्ट्रीय अध्यक्ष छावा भारत क्रांती मिशन के अध्यक्ष डॉ विलास पांगारकर यांनी केले होते. १३ फूट अश्वारूढ पुतळ्या सह यह ही यात्रा १३ में रोजी आग्रा रात्री उशिरा पोहचली. यावेळी डॉ अलौकिक उपाध्यायजी, भाजप आग्रा महानगर प्रमुख राजकुमार गुप्ता, मनोजित पार्षद सुनिल कमचंदानी, महानगर महामंत्री आगरा महेश शर्मा, विवेक लौथी, भाजप युवा मोर्चा अध्यक्ष ललीत शर्मा आदी सह भाजप के पदाधिकारी मान्यवर उपस्थित होते.



अलौकिक उपाध्याय यांनी आलेल्या यात्रे करुचे स्वागत केले. आग्रा मध्ये कॅबिनेट मंत्री योगेंद्र उपाध्यायजी यांच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक बनवण्यात येत आहे. जे भविष्यात ताज पेक्षाही मोठे निर्माण होणार आहे. आयोजक डॉ विलासभाऊ पांगारकर छावा भारत क्रांती मिशन यांच्या वतीने जेथे छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांनी पाउल ठेवले त्या ठिकाणी ही राष्ट्रीय स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात येते. जेणे येणाऱ्या युवा पिढीला या महापुरुषांचे कार्य इतीहास समजेल.

यावेळी आग्रा किल्ला येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक येथे नाशिक इथून आलेल्या छत्रपती संभाजी महाराज यांच्या दोन्ही पुतळ्याचे पूजन अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी मुख्य समन्वयक विजय काकडे पाटील, संघटक परमेश्वर नलावडे पाटील, राजस्थान समन्वयक शशिकांत पवार, मिडिया समन्वयक अमोल सोनवणे, निवृत्ती मुरडणर, अतुल पांगारकर, ज्ञानेश्वर पालखेडे आदींनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी आग्रा येथील शिवशंभु भक्ता सह रथयात्रेतील यात्रे करु उपस्थित होते यावेळी केंद्रीय राज्यमंत्री मंत्री बघेल , कॅबिनेट मंत्री योगेंद्र उपाध्यायजी यांना निवेदन देत मुंबई आग्रा हायवे चे नाव छत्रपती शिवाजी महाराज हायवे द्यावे हे निवेदन देण्यात आले.

## संशोधन प्रकल्पांवर एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन

ओतूर : (स. गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शरदचंद्र पवार इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट तर्फे संशोधन प्रकल्पांवर "फिल्ड वर्क प्रोजेक्ट, डेस्क रिसर्च आणि रिसर्च प्रोजेक्ट" या विषयावर एक दिवशीय कार्यशाळेचे यशस्वी आयोजन दि. १२ मे रोजी करण्यात आले होते. विद्यार्थी आणि अध्यापकांमध्ये संशोधन कौशल्ये विकसित करणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. या कार्यशाळेत डॉ. रमेश काकड, डॉ.तारिक इनामदार व प्रा.गणेश आभाळे या तज्ञ मार्गदर्शकांनी संशोधन पद्धती, डेटा संकलन तंत्र, साहित्य आढावा आणि अहवाल लेखन यावर मार्गदर्शन केले. सहभागींना प्रभावी संशोधन प्रकल्पांची आखणी व अंमलबजावणी याचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले,



ज्यामुळे सैद्धांतिक ज्ञान आणि व्यावहारिक वापर यातील अंतर कमी होण्यास मदत झाली. यावेळी महाविद्यालयाचे संचालक डॉ. सुनील लोसारवार यांनी सांगितले की, "विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाभिमुख दृष्टीकोन निर्माण करणे आणि दर्जेदार संशोधनाला प्रोत्साहन देणे हा या कार्यशाळेचा उद्देश आहे, कार्यशाळेला महाविद्यालयाचे विद्यार्थ्यांचा व अध्यापकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला, ज्यामुळे सहकार्यपूर्ण व अध्ययनपूरक वातावरण निर्माण झाले."

# शहीद जवानांच्या मूळ गावी स्मारक उभारण्यासाठी प्रशासन कटिबद्ध

- पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील
- शहीद जवानाच्या कुटुंबास एक कोटींची मदत गुणवंत अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव

अहिल्यानगर : (स. गांवकरी)




देशाच्या रक्षणासाठी प्राणार्पण करणाऱ्या शहीद जवानांचे केवळ स्मरण न राहता त्यांच्या बलिदानाची स्मृती कायम राहावी, यासाठी त्यांच्या मूळ गावी स्मारके उभारण्याबाबत प्रशासन कटिबद्ध असल्याची ग्वाही जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

महाराष्ट्र दिनानिमित्त जिल्हा प्रशासनाच्यावतीने उत्कृष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान व पुरस्कार सोहळा आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार विठ्ठलराव लंघे पाटील, आमदार अमोल खताळ, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, उपमहापौर धनंजय जाधव, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक आदी उपस्थित होते.

जिल्ह्यातील शहीद जवान शिपाई संदीप पांडुरंग गायकर यांच्या पत्नी श्रीमती दिपाली संदीप गायकर यांना राज्य शासनाच्या वतीने एक कोटी रुपयांचा धनादेश पालकमंत्र्यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला. यावेळी पालकमंत्र्यांनी शहीद कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करत, प्रशासन व संपूर्ण जिल्हा त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील, असा विश्वास दिला.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले की, उल्लेखनीय कार्यातून अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वतःसह जिल्ह्याचाही लौकिक वाढवला आहे. प्रशासनातील सर्व घटकांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे जिल्ह्याचा नावलौकिक राज्यभर वाढला असून शासनाला या गुणवंत अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सार्थ अभिमान आहे.

जिल्ह्याची कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यात पोलीस दलाचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे सांगताना त्यांनी पोलीस अधिकारी व जवानांचे विशेष कौतुक केले. मनुष्यबळाची कमतरता असतानाही संपूर्ण जिल्ह्याच्या सुरक्षेची जबाबदारी सक्षमपणे पार पाडणाऱ्या पोलीस दलाच्या तत्परतेमुळे जिल्हा अधिक सुरक्षित राहिल्याचे त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्र दिनानिमित्त १ मे रोजी पोलीस कवायत मैदानावर हा सत्कार सोहळा आयोजित करण्याचे नियोजन होते. मात्र, कर्तव्यावर असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी तसेच पुरस्कारार्थींना योग्य सन्मान मिळावा या उद्देशाने कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

कोविड ड्युटी बजावताना मृत्यू झालेल्या ग्रामपंचायत शिपाई कै. शिवाजी भीमाजी गुडेकर यांच्या वारसदार रविंद्र शिवाजी गुडेकर व राजेंद्र शिवाजी गुडेकर यांना ५० लाख रुपयांची मदत यावेळी प्रदान करण्यात आली. विविध क्षेत्रांत उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय दशरथ घोगरे यांना 'वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न पुरस्कार', पोलीस पाटील दादासाहेब गणपत भोसले यांना 'राज्यपाल विशेष उल्लेखनीय सेवा पुरस्कार' तसेच ग्राम महसूल अधिकारी संगीता मुरलीधर मगर यांचा गौरव करण्यात आला.

## थोडक्यात पण महत्वाचे




### ओतूरमधील लॉजमध्ये महिलेचा मृतदेह आढळल्याने खळबळ!

ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील अमृत लॉजमध्ये एका विवाहित महिलेचा मृतदेह आढळून आल्याची धक्कादायक घटना शनिवारी सकाळी उघडकीस आली. स्नेहल अमोल शिंदे (वय ३१, रा. अवसरी, ता. आंबेगाव, जि. पुणे) असे मृत महिलेचे नाव असून, या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. माहितीनुसार, वाघिरे महाविद्यालयासमोर असलेल्या अमृत लॉजमध्ये संबंधित महिला वास्तव्यास होती. सकाळी बराच वेळ रूमचा दरवाजा न उघडल्याने लॉज व्यवस्थापनाला संशय आला. त्यानंतर तातडीने पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून दरवाजा उघडला असता महिला बेशुद्ध अवस्थेत आढळून आली. महिलेला त्वरित ओतूर प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीनंतर तिला मृत घोषित केले. घटनेनंतर पोलिसांनी लॉज परिसराची पाहणी करून तपासाला सुरुवात केली आहे. या प्रकरणात मृत्यूचे कारण अद्याप अस्पष्ट असून, पोलिस विविध अंगांनी तपास करत आहेत. लॉजमधील नोंदवही, सीसीटीव्ही फुटेज आणि संबंधित व्यक्तींची चौकशी करण्यात येत असल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून, अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण समोर येणार आहे. या घटनेची नोंद ओतूर पोलिस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. दरम्यान, शैक्षणिक परिसरालगत लॉज व्यवसाय सुरू असल्याने स्थानिक नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत असून, प्रशासनाने अशा ठिकाणांवर अधिक लक्ष देण्याची मागणी होत आहे.

### कळवणच्या कनाशीत भोवाडा उत्सवाची धूम



कळवण (स. गांवकरी) : कळवण तालुक्यातील आदिवासी भागातील कनाशी येथे वडिलोपार्जित परंपरा असलेल्या भोवाडा उत्सवाला मोठ्या उत्साहात सुरुवात झाली असून, संबळाच्या तालावर विविध प्रकारची सोंगे काढून गावकरी ग्रामदेवतेचा जागर करत आहेत. दि. 14 मेपासून सुरू झालेला हा पाच दिवसीय उत्सव सोमवारी समाप्त होणार आहे. कनाशी हे डोंगराळ व आदिवासीबहुल गाव आहे. गावाच्या सुख-शांतीसाठी भोवाडा उत्सव साजरा करण्याची शेकडो वर्षांची परंपरा आहे. यंदाच्या उत्सवातही गावकऱ्यांनी ही परंपरा मोठ्या श्रद्धेने जपली आहे. उत्सवाच्या पहिल्या दिवसापासूनच गावात संबळाचा निनाद घुमत आहे. सायंकाळ होताच तरुण मुले वाघ, अस्वल, हनुमान, अशी अनेक देवी देवतांची हुबेहूब सोंगे घेऊन गावातून मिरवणूक काढत आहेत. संबळाच्या विशिष्ट ठेक्यावर सोंग्यांचा फेर धरला जात असून, हे पाहण्यासाठी कनाशीसह तालुक्यातील परिसरातील बघ्यांनी मोठी गर्दी केली होती. गावातील जेष्ठ नागरिक सांगतात की, "आमच्या बापजाद्यांपासून हा उत्सव सुरू आहे. नोकरी-व्यवसायासाठी बाहेरगावी गेलेली तरुण पोरंही भोवाड्यासाठी आवर्जून गावी येतात." उत्सवाचा संपूर्ण खर्च गावकरी वर्गणीतून करतात. उत्सव काळात गावात पूर्णपणे लोक ही आवर्जून संध्याकाळी उपस्थित राहतात . त्यामुळे महिला व लहान मुलांचाही सहभाग मोठा असतो. पाच दिवस चालणाऱ्या या लोकसंस्कृतीच्या सोहळ्यामुळे कळवण तालुक्याच्या पूर्व भागात भक्तिमय व चैतन्यमय वातावरण निर्माण झाले आहे.

### अहिल्यानगर जिल्ह्यात बैलगाडा शर्यतीनंतर युवकावर गोळीबार

अहिल्यानगर (स. गांवकरी) : बैलगाडा शर्यतीनंतर गोळीबारात करताना स्वतःच जखमी झालेल्या युवकाला नेवासा पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडून गावठी कट्टा हस्तगत करण्यात आला आहे. सुयश नानासाहेब नवथर (रा. पिंपरी शहाली, नेवासा) असे अटक केलेल्या युवकाचे नाव आहे. नेवासा तालुक्यातील पिंपरी शहाली येथे ही घटना गेल्या रविवारी घटना घडली. त्यानंतर जखमी झालेला सुयश नवथर फरार झाला होता. तो पुन्हा पिंपरी शहाली गावात येणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी काल, शुक्रवारी त्याला अटक केली. त्याच्याकडून गावठी कट्टा जप्त करण्यात आला असला तरी गोळीबाराची घटना नेमकी कशामुळे घडली याची चौकशी केली जात असल्याची माहिती नेवासा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांनी दिली. पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांनी दिलेल्या माहितीनुसार पिंपरी शहाली गावामध्ये रविवारी यात्रा होती. या यात्रेनिमित्त बैलगाडा शर्यत आयोजित करण्यात आली होती. मात्र या बैलगाडा शर्यतीसाठी परवानगी घेण्यात आलेली नव्हती किंवा त्यासाठी परवानगी मागणारा अर्जही देण्यात आलेला नव्हता तसेच पोलीस बंदोबस्तही मागवण्यात आला नव्हता. बैलगाडा शर्यत झाल्यानंतर सुयश नवथर याने गावठी कट्ट्यातून गोळीबार केला. गोळी त्याच्या उजव्या पायाच्या घोट्याला लागून तो जखमी झाला. मात्र याची तक्रार कोणीही पोलिसांकडे नोंदवली नाही तसेच कोणीही नवथर याने आपल्यावर गोळीबार केला, अशी तक्रार दिली नाही. गावठी कट्टा हाताळताना निष्काळजीपणे गोळी उडाल्याचे तो सांगत असला तरी पोलिसांनी अधिक चौकशी सुरू केली आहे. पोलीसांनी त्याच्याकडून २० हजार रुपये किंमतीचा, स्टीलचा, देशी बनावटीच्या गावठी कट्टा जप्त केला आहे. यासंदर्भात पोलिस अंमलदार नारायण डमाळे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक विकास पाटील करत आहेत.

### संचालक फुंदे अटकेत; रक्कम बँकेतून काढल्याचा आरोप

अहिल्यानगर (स. गांवकरी) : गुंतवणूकदारांची फसवणूक करणाऱ्या सह्याद्री मल्टीसिटी निधी लिमिटेड या संस्थेच्या गैरव्यवहार प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखेने कारवाई करत या गुन्ह्यातील मुख्य सूत्रधारांपैकी एक असलेला संचालक नीलेश शिवाजी फुंदे (रा. बोधेगाव, ता. शेवगाव) याला अटक केली आहे. तपास अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक शिशिरकुमार देशमुख यांनी त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने तीन दिवसांची (दि.१८ मे पर्यंत) पोलीस कोठडी दिली आहे. दरम्यान, यासंदर्भात लेखापरीक्षकांनी सादर केलेल्या फॉरेन्सिक अहवालातून या घोटाळ्याचे धक्कादायक धागेदोरे समोर आले आहेत. फुंदे हा या समूहाच्या २६ पैकी नऊ कंपन्यांमध्ये संचालक म्हणून कार्यरत होता. त्याने कंपनीच्या बँक खात्यातून सुमारे ३७ लाख रूपये स्वतःच्या वैयक्तिक खात्यात वळवून घेतले. यामध्ये बँक दोन बँकेतील व्यवहारांचा समावेश आहे. इतकेच नव्हे तर, संशयित आरोपीने वर्षभरात एक कोटी रूपयांहून अधिक रोख रक्कम बँकेतून काढल्याचेही तपासातून स्पष्ट झाले आहे. या घोटाळ्यात संस्थापक चेअरमन संदीप सुधाकर थोरात आणि इतर संचालकांनी संगणमत करून ठेवीदारांच्या कष्टाचे पैसे स्वतःच्या फायद्यासाठी वापरले.

# प्रशासकीय मान्यता, निविदा प्रक्रिया वेळेत पूर्ण करा

## पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील

- अहिल्यानगर जिल्ह्यातील सहा ग्रामीण तीर्थक्षेत्रांना ‘क’ वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्यास मान्यता
- ८८५ कोटी रुपयांच्या अंतिम आराखड्यास मंजुरी
- जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा नियोजन समितीची बैठक संपन्न



अहिल्यानगर : (स. गांवकरी)

जिल्हा नियोजन समितीअंतर्गत लोकप्रतिनिधींनी पुढील दहा दिवसाच्या आत शिफारशी सादर कराव्यात तसेच प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर दोन महिन्यांच्या आत निविदा प्रक्रिया पूर्ण करावी. विहित वेळेत निविदा प्रक्रिया पूर्ण न झाल्यास संबंधित निधी इतर विकासकामांसाठी वळविण्यात येऊन प्रस्तावांना विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करत त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्याचे निर्देश जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा नियोजन समितीच्या आढावा बैठकीत पालकमंत्री डॉ.विखे पाटील बोलत होते. बैठकीस आमदार किशोर दराडे, आमदार विठ्ठल लंघे, आमदार अमोल खताळ, आमदार विक्रमसिंह पाचपुते, आमदार हेमंत ओगले, आमदार अक्षय कर्डीले, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर उपस्थित होते. दूरदृश्य प्रणालीद्वारे खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार सत्यजित तांबे, आमदार विवेक कोल्हे, आमदार किरण लहामटे, आमदार काशिनाथ दाते आदी उपस्थित होते. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीय निधी, आदिवासी उपयोजना व इतर आदिवासी उपयोजनांचा शंभर टक्के निधी वेळेत खर्च केल्याबद्दल प्रशासनाचे अभिनंदन करत पालकमंत्री डॉ.विखे पाटील म्हणाले, आगामी सन २०२६-२७ या वर्षासाठी शासनाने सर्वसाधारण योजनेत ८८५ कोटी रुपयांच्या अंतिम आराखड्यास मंजुरी दिली आहे. या निधीतून प्रशासकीय कामकाजाला गती देण्यासाठी १५ वर्षांपेक्षा जुनी झालेली शासकीय वाहने निर्लेखित करावीत. तसेच तहसीलदार व नव्याने निर्माण झालेल्या तालुक्यांसाठी नवीन वाहने खरेदीचे प्रस्ताव तातडीने सादर करावेत, असे निर्देश त्यांनी दिले. शहरांमधील वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी तसेच अत्याचाराच्या प्रलंबित प्रकरणांमध्ये प्रभावी देखरेख ठेवण्यासाठी प्रत्येक नगरपरिषद व नगरपंचायतीने स्वतःच्या निधीतून सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. त्याच्या देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांची राहील व पोलिस विभागाकडून त्याचे संनियंत्रण केले जाईल. पुढील पाच वर्षांच्या वार्षिक देखभाल करारासह निविदा प्रक्रिया राबविण्यात याव्यात. शाळांच्या जुन्या व धोकादायक इमारतींच्या निर्लेखन प्रक्रियेत विलंब होऊ नये. विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी तातडीने आवश्यक कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देशही पालकमंत्री डॉ.विखे पाटील यांनी दिले. ते पुढे म्हणाले, विकास कामांच्या ठिकाणी माहिती फलक न लावणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाई करून त्यांना काळ्या यादीत टाकण्यात यावे. महामार्गांच्या रखडलेल्या कामांबाबत भूसंपादनातील अडथळे महसूल विभागाच्या मदतीने तातडीने दूर करावेत. वनविभागाची ना हरकत प्रमाणपत्रे वेळेत मिळण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वय बैठक घ्यावी. प्रशासकीय आढावा बैठकींमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधींना पूर्वकल्पना देऊन आमंत्रित करण्याचे निर्देशही पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी यावेळी दिले. ग्रामीण भागातील सायंकाळच्या भारनियमनामुळे नागरिक, शेतकरी व विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याने हे भारनियमन दुपारच्या वेळेत करण्याचे नियोजन करावे. अतिभारित रोहित्रांचा प्रश्न सोडवून कृषी पंपांना पुरेशा दाबाने वीजपुरवठा सुनिश्चित करण्यात यावा.

## दिव्यात ठाणे महापालिका बांधणार इंग्रजी शाळा

ठाणे : (स. गांवकरी)



ठाणे महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या सुमारे १५ हजार विद्यार्थ्यांच्या समायोजनाचा प्रश्न गंभीर बनला असताना दिवा परिसरात नवीन इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा उभारण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव महापालिकेकडून तयार करण्यात आला आहे. यासंदर्भातील प्रस्ताव महासभेच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असून शासनाकडे अंतिम मंजुरीसाठी पाठविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ठाणे महापालिका क्षेत्रातील सुमारे ६२ अनधिकृत इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शाळांना आवश्यक शासकीय मान्यता नसल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचे जवळच्या मान्यताप्राप्त शाळांमध्ये समायोजन करण्यासाठी महापालिकेने पर्यायांचा शोध सुरू केला आहे. त्याचाच एक भाग म्हणून दिवा प्रभाग समिती क्षेत्रात नवीन इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दिवा परिसरात शाळेसाठी आरक्षित भूखंड उपलब्ध झाल्यास तेथे आधुनिक सुविधांनी सुसज्ज शाळेची इमारत उभारता येईल, असा प्रस्ताव शिक्षण विभागाने तयार केला आहे. विशेष म्हणजे महापालिकेच्या शिक्षण विभागाकडे मनुष्यबळाची कमतरता असल्याने ही प्रस्तावित शाळा सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्वावर अनुभवी खासगी संस्थेमार्फत चालविण्याचाही विचार करण्यात आला आहे.

## लोकशाही परिवाराचे सर्वेसर्वा यावलकर परिवाराच्या वतीने आयोजित भव्य (रिसेप्शन सोहळा) स्वागत समारंभ जळगाव येथे उत्साहात संपन्न!

### समाजसेवक नानजीभाई ठक्कर यांची प्रमुख उपस्थिती!



जळगाव : (स. गांवकरी)

लोकशाही परिवाराचे सर्वेसर्वा यावलकर परिवाराच्या वतीने आयोजित करण्यात आलेला चि. पुष्कर आणि चि. सौ. कां. श्रुती यांच्या शुभविवाहानिमित्त भव्य स्वागत समारंभ मोठ्या उत्साहात आणि दिमाखदार वातावरणात पार पडला. दिनांक १४ मे २०२६ रोजी आदित्य फार्म लॉन्स येथे आयोजित या सोहळ्यास जिल्हाभरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, आप्तेष्ट, मित्रपरिवार आणि हितचिंतकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली होती. भारतीय संस्कृतीची परंपरा जपत वेदमंत्रांच्या मंगल उच्चारात विवाहसोहळ्याला अध्यात्मिक स्वरूप प्राप्त झाले. साधुसंतांच्या आशीर्वादांनी नवदांपत्याला शुभाशीर्वाद देण्यात आले. तसेच वारकरी संप्रदायाच्या टाळ-मृदुंगाच्या गजरामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता.

सोहळ्यात पंजाबी ढोलच्या तालावर जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले. पारंपरिक संस्कृती आणि आधुनिक उत्साहाचा सुंदर संगम या कार्यक्रमात अनुभवायला मिळाला. उपस्थितांनीही या आनंदोत्सवात उत्स्फूर्त सहभाग घेतला. नानासाहेब श्री कमलाकरजी व ताईसाहेब सौ. शांता वाणी, श्री राजेश यावलकर व सौ. शुभांगी यावलकर तसेच लोकशाही समूहातील सदस्यांनी उपस्थित पाहुण्यांचे आत्मीयतेने स्वागत केले.

या स्वागत समारंभात पाहुण्यांसाठी विशेष बुफे मेजवानीची व्यवस्था करण्यात आली होती. विविध पारंपरिक व स्वादिष्ट खाद्यपदार्थांचा उपस्थितांनी मनमुराद आस्वाद घेत भोजन व्यवस्थेचे विशेष कौतुक केले.

एकंदरीत, हा स्वागत समारंभ आनंद, संस्कृती, परंपरा आणि सामाजिक ऐक्याचा अविस्मरणीय संगम ठरला. उपस्थित मान्यवरांनी नवविवाहित दांपत्यावर शुभेच्छांचा वर्षाव करत त्यांच्या सुखी, समृद्ध आणि मंगलमय वैवाहिक जीवनासाठी आशीर्वाद दिले.

## बिअर बार फोडणारी आंतरराज्यीय टोळी जेरबंद

### ५ गुन्हे उघड, साडेपाच लाखांचा मुद्देमाल जप्त!



अहिल्यानगर : (स. गांवकरी)

संगमनेर परिसरातील बिअर बार आणि हॉटेल दुकाने फोडून विदेशी दारू व इतर साहित्य चोरी करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीला स्थानिक गुन्हे शाखेने गजाआड केले असून आरोपींकडून पाच गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत. पोलिसांनी आरोपींकडून ५ लाख ५५ हजार १६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

घारगाव पोलीस ठाण्यात गु.र.नं. १४२/२०२६ अन्वये दाखल गुन्ह्यात फिर्यादी किशोर बाळाजी डोके यांच्या खंदरमाळवाडी येथील हॉटेल निलायम बारचे शटर फोडून तब्बल ३ लाख ६ हजार १९० रुपयांची विदेशी दारू, सिगारेट तसेच सीसीटीव्ही डीव्हीआर चोरीला गेला होता.

या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सुरू केला. पोउपनिरीक्षक महादेव गुट्टे व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी करून तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींचा माग काढला. तपासादरम्यान हसन हमजा कुट्टी हा सराईत आरोपी आपल्या साथीदारांसह नाशिक येथे असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी म्हाडा बिल्डिंग, वडाळा परिसरातून आरोपी १) हसन हमजा कुट्टी, २) आकाश सचिन सूर्यवंशी, ३) मेहताब गुलाम रसूल अन्सारी यांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी झारखंड येथील बंटी दास या फरार साथीदारासह चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. तपासात आरोपींनी चोरीचा मुद्देमाल नाशिक जिल्ह्यातील पळसे येथील लकी बार अँड रेस्टॉरंटचे चालक किरण उगले व विवेक उगले यांना विक्री केल्याचे निष्पन्न झाले. तसेच चोरीसाठी वाहन उपलब्ध करून दिल्याचाही खुलासा झाला. पोलिसांनी आरोपींकडून ४ लाख ५ हजार १६० रुपयांची विदेशी दारू, १ लाख ५० हजार रुपये किमतीची टाटा इंडिका कार, कटर, मंकी मास्क, एअर पिस्टल, स्क्रू ड्रायव्हर असा एकूण ५ लाख ५५ हजार १६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तपासादरम्यान आरोपींकडून संगमनेर तालुका, वावी आणि पिंपळगाव बसवंत परिसरातील आणखी चार गुन्हे उघडकीस आले आहेत. अटक आरोपींना घारगाव पोलीस ठाण्यात हजर करून पुढील तपास सुरू आहे.

## सावरचोळ येथील बिरोबा देवस्थानला ‘क’ वर्ग दर्जा

संगमनेर खुर्द : (स. गांवकरी)



तालुक्यातील सावरचोळ (मेंगाळवाडी) येथील जागृत आणि भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या बिरोबा महाराज देवस्थानला ‘क’ वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा प्रदान करण्यात आला आहे. या साठी संगमनेर तालुक्याचे आमदार अमोल खताळ यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पाठपुरावा केला होता या पाठपुराव्याला यश आले आहे क वर्ग दर्जा मिळाल्यामुळे देवस्थानच्या विकासाला गती मिळाली आहे. त्यामुळे भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. बिरोबा देवस्थान हे सावरचोळ (मेंगाळवाडी) तसेच अकोले-संगमनेर परिसरातील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान मानले जाते. वर्षभर येथे दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक येत असतात. यात्रोत्सव, धार्मिक कार्यक्रम आणि पारंपरिक उत्सवां मुळे या देवस्थानाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. शासनाकडून ‘क’ वर्ग दर्जा मिळाल्यामुळे मंदिर परिसरा तील पायाभूत सुविधा, रस्ते, पिण्याचे पाणी, स्वच्छता, भक्तनिवास आणि इतर विकासकामांसाठीचा निधी उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. संगमनेर तालुक्यातील सावरचोळ (मेंगाळवाडी) येथील ग्रामदैवत बिरोबा महाराज मंदिर संपूर्ण पंचक्रोशीचे श्रद्धास्थान आहे या देवस्थानचा क वर्ग दर्जात समावेश व्हावा यासाठी आम्ही दोन ते अडीच वर्षांपूर्वी महाविकास आघाडी सरकारच्या काळात प्रस्ताव दाखल केला होता.

# भाजप युवा मोर्चाची अर्धापूर तालुका जंबो कार्यकारी जाहीर

अर्धापूर : (स. गांवकरी)



तालुक्यातील भाजप युवा मोर्चाचे सक्रिय कार्यकर्त्यांच्या कार्याची दखल घेऊन भाजयुमोची तालुका कार्यकारिणी १५ जनांची तर शहर कार्यकारिणी २६ जनांची अशी ४१ जनांची जंबो कार्यकारणी ची निवड जाहीर करण्यात आली आहे.

माजी मुख्यमंत्री,खा.अशोकराव चव्हाण व आ.श्रीजयाताई चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तर भाजप जिल्हाध्यक्ष ॲड किशोर देशमुख,नांदेड कृऊबाचे सभापती संजय देशमुख लहानकर, भाऊरावचे चेअरमन नरेंद्र चव्हाण,भाजप तालुकाध्यक्ष बालाजी गव्हाणे यांच्या सुचनेवरून भाजयुमोचे तालुकाध्यक्ष पवन इंगोले यांनी भाजयुमोच्या ता.सरचिटणिस पदी परमेश्वर बंडाळे,कुश भांगे,तर ता.उपाध्यक्ष पदी कोंडीबा सुर्यवंशी,हेमंत देशमुख, भिमराव गव्हाणे,रवी शिंदे संतोष कदम,संभाजी शिंदे, तर तालुका चिटणीस बाबुराव क्षीरसागर,योगेश दुधाटे,प्रंसनजित लोणे, नारायण आढाव,मुंजाजी बारसे,अंकुश कदम, तसेच कोषाध्यक्ष पदी अरुण क्षीरसागर यांची तर अर्धापूर शहर कार्यकारिणी भाजप युवा मोर्चाच्या शहराध्यक्षपदी तुकाराम माटे शहर सरचिटणीस पदी व्यंकटी लंगडे, गजानन माटे, तरी शहर उपाध्यक्षपदी आकाश साखरे,लवराज माटे,शंकर डोलारकर,मारुती जाधव, देविदास गव्हाणे,साईनाथ सौदागर,शहर चिटणीस पदी राणोजी महाकाळ, मारुती शेटे,शुभम लुटे, प्रशांत वाघुतकर, कोषाध्यक्षपदी अमित साबळे,शहर सदस्य पदी विकास गुरखेल, सूर्यकांत बोराटे,आनंदा वनटनकर, मन्मथ हिंगमिरे,लक्ष्मण गाढवे,नवीन वनटनकर, ज्ञानेश्वर पवार,दीपक सौदा,सुमित सिनगारे, गणपती बारसे,शंकर करंडे,गजानन गरड यांची ४१ जनांची भाजप युवा मोर्चाची जंबो कार्यकारणीची निवड झाल्याचे नियुक्ती पत्राद्वारे कळविले आहे.जाहीर करण्यात आली आहे.नवनिर्वाचित भाजप युवा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांची निवड झाल्याबद्दल नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे,माजी उपनगराध्यक्ष राजेश्वर शेटे, राज्य समिती सदस्य डॉ.लक्ष्मण इंगोले, संचालक निळकंठराव मदने, राजू बारसे, सरपंच विजय भुस्से,जिल्हा उपाध्यक्ष नागोराव भांगे,भाजपाचे आनंदराव भंडारे,भाजप शहराध्यक्ष योगेश हाळदे, गुरूराज रणखांब,प्रमोद कल्याणकर,ईश्वर कपाटे,माजी नगरसेवक तुकाराम साखरे, माजी जि.प.सदस्य रामराव भालेराव,युवा नेते विराज देशमुख,विठ्ठल काकडे,माजी तालुकाध्यक्ष जठन मुळे,राजू लोणे,संतोष पवार,खंडेराव मस्के,गौतम सावते,स्वप्निल राठोड यांच्या सह अनेकांनी अभिनंदन केले आहे.

# 'स्वारातीम' विद्यापीठातील 'स्पोर्ट्स फिटनेस समर कॅम्प २०२६'चा समारोप

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या 'स्पोर्ट्स फिटनेस समर कॅम्प २०२६'चा उत्साहात समारोप झाला. विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग आणि फिजिकल एज्युकेशन फाऊंडेशन ऑफ इंडिया (PEFI) यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १ ते १५ मे २०२६ या कालावधीत हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. या उन्हाळी शिबिरामध्ये विद्यार्थ्यांच्या शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच क्रीडा कौशल्य विकासावर विशेष भर देण्यात आला. शिबिरात अॅथलेटिक्स, व्हॉलीबॉल, खो-खो, क्रिकेट, कबड्डी, बास्केटबॉल आणि हॉकी यांसारख्या मैदानी खेळांचे प्रशिक्षण देण्यात आले. तसेच जिम्नॅस्टिक्स, टेबल टेनिस, बॅडमिंटन, एरोबिक्स, बॉक्सिंग, योगा, वेटलिफ्टिंग आणि फिजिकल फिटनेस यांचेही प्रशिक्षण सहभागी विद्यार्थ्यांना देण्यात आले.




शिबिराचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सहभागी खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाची भव्य क्रीडांगणे आणि आधुनिक इनडोअर स्टेडियमची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. राष्ट्रीय स्तरावरील अनुभवी प्रशिक्षक व तज्ज्ञ मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व मार्गदर्शन केले. तसेच सहभागींसाठी मोफत बस सेवा आणि टी-शर्टची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली होती.

५ ते १८ वर्षे वयोगटातील एकूण ७० मुले व मुलींनी या शिबिरात सहभाग घेतला. उन्हाळी सुटीचा सदुपयोग करत मुलांच्या शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच क्रीडा कौशल्य विकसित करण्यासाठी हे शिबिर उपयुक्त ठरल्याची भावना अनेक पालकांनी व्यक्त केली.

यावेळी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी विद्यार्थ्यांनी मोबाईलपासून दूर राहून खेळ, व्यायाम आणि योगाला प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले. निरोगी शरीरासाठी नियमित खेळणे आणि योगाभ्यास आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

समारोप कार्यक्रमास क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. भास्कर माने, नॅक सेलचे संचालक डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी, डॉ. चैतन्य, डॉ. कुलजीत राणा आणि डॉ. पारस यादव उपस्थित होते.

शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ. विजय जाधव, पूनम यादव, संजयसिंह ठाकूर, शिवाजी हंबर्डे, सुनील लुटे, परमजोतसिंग सिद्धू आणि रतनसिंग पुजारी यांनी विशेष परिश्रम घेतले.



देगलूर पोलीस स्टेशन येथे नव्याने रुजू झालेले पोलीस निरीक्षक (PI) सूर्यमोहन बोलमवाड यांचे स्वागत करताना शिवसेना युवा सेना जिल्हाप्रमुख नामदेव पाटील थडके देगावकर व राहुल पाटील थडके

## थोडक्यात पण महत्वाचे

### छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त श्री परशुराम प्रतिष्ठानतर्फे अभिवादन



अहिल्यानगर (स. गांवकरी) : धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त श्री परशुराम प्रतिष्ठान यांच्या वतीने भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. यावेळी छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांच्या शौर्य, पराक्रम आणि राष्ट्रनिष्ठेला अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाला प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय देशपांडे यांच्यासह श्रिया देशमुख अतुल शुक्ल अथर्व देशपांडे सार्थक भोंग देवांग कुलकर्णी अभिराम कुलकर्णी अथर्व कुकडे संकल्प उदास सायली कुलकर्णी ऋतू वैद्य अवधूत रामदासी अद्वैत शुक्ल विकास कुलकर्णी अमित डोंगरे,संजय जोशी ,उपेंद्र धर्माधिकारी, प्रकाश जोशी ,उदय जोशी आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या कार्याचा आदर्श घेऊन समाजहितासाठी कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला. यावेळी अध्यक्ष विजय देशपांडे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "छत्रपती संभाजी महाराज हे केवळ पराक्रमी योद्धे नव्हते, तर धर्मरक्षणासाठी आणि स्वराज्यासाठी अखेरच्या श्वासापर्यंत लढणारे प्रेरणास्थान होते. त्यांच्या बलिदानामुळे स्वराज्याची ज्योत अखंड तेवत राहिली. आजच्या तरुण पिढीने त्यांच्या विचारांमधून राष्ट्रप्रेम, धैर्य आणि स्वाभिमान यांची प्रेरणा घ्यावी. समाजात एकता, संस्कार आणि देशभक्तीची भावना वृद्धिंगत करण्यासाठी अशा कार्यक्रमांची गरज आहे," असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे वातावरण उत्साहपूर्ण व प्रेरणादायी होते. उपस्थितांनी जयघोष करत छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन केले.

### अर्धापूर जवळ भीषण अपघात, ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

अर्धापूर (स. गांवकरी) : मालेगाव ते उमरी रस्त्यावरील उमरी पाटीजवळ ट्रक आणि दुचाकीचा अपघात झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या अपघातात कपिल सुदाम आठवले (वय ३६, रा. उमरी) यांचा जागीच मृत्यू झाला. उमरी पाटीवरून गावाकडे वळत असताना पाठीमागून येणाऱ्या भरधाव ट्रकने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. कपिल आठवले हे आपल्या दुचाकीवरून नांदेड येथील विवाह सोहळा आटपुन उमरीकडे जात होते. उमरी पाटीजवळ ते आपल्या गावाकडे वळत असताना पाठीमागून येणाऱ्या ट्रकने (क्र. आर.जे.११ जि.सी. २८३३ ) त्यांच्या दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की ट्रकने कपिल आठवले यांना काही अंतरापर्यंत फरफटत नेले. अपघाताची माहिती मिळताच जगद्गुरु नरेंद्रचार्य महाराज संस्थानच्या रुग्णवाहिकेचे चालक राजू पाचंगे आणि महामार्ग पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. जखमी कपिल आठवले यांना तातडीने अर्धापूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासून 'मृत' घोषित केले. सदर घटनेनंतर रस्त्यावर काही काळ वाहतुकीची कोंडी झाली होती. सपोउपनी गुट्टे, सलिम माणिकपेठे, जहीर फारूखी, संदीप चटलेवार, धनराज पुरी, जसप्रितसिंघ शाहु आणि वसंत सिनगारे यांनी घटनास्थळी मदतकार्य करून अपघातग्रस्त वाहने बाजूला सारली व वाहतूक सुरळीत केली. मृत कपिल आठवले यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, दोन लहान मुले आणि भावंडे असा परिवार आहे. त्याचा अपघाती मृत्यू झाल्याने उमरी गावात आणि परिसरात शोककळा पसरली आहे. पोलिसांनी ट्रक ताब्यात घेतला असुन गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.



### अज्ञात आरोपीस अवघ्या दोन तासात अटक करून मुद्देमाल जप्त

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : अंध महिलेचे दागीने चोरणाऱ्या अज्ञात आरोपीस अवघ्या दोन तासांत जेरबंद करून १००% मुद्देमाल जप्त करुन १२ तासांत दोषारोपपत्र दाखल नांदेड ग्रामीण पोलीसांनी कार्यवाही केली असुन सदरील प्रकरणातील अधिकारी व पोलीस कर्मचारी यांचे जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी अभिनंदन केले आहे. अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी ऑपरेशन फ्लश आऊट अतंर्गत मालाविरुध्दचे गुन्हे उघडकीस आणने बाबत सर्व पो. स्टे. प्रभारी अधिकारी यांना आदेश दिले होते. त्या अनुषंगाने वरील नमुद गुन्ह्यातील फिर्यादी व तिचे पती दोघे अंध असुन फिर्यादी ह्या घरासमोर केस विंचरत असताना गळ्यातील मंगळसुत्र खाली काढुन ठेवले होते. पंरतु कोणीतरी अज्ञात व्यक्तीने काढुन ठेवलेले दोन ग्रॅम सोन्याचे मंगळसूत्र फिर्यादी व फिर्यादीचे पती असे दोघेही अंध असल्याचा फायदा घेवून चोरुन नेले होते, त्यावरुन फिर्यादी ह्या दिनांक १५ मे रोजी पोस्टेला तक्रार देण्यासाठी आल्यानंतर तात्काळ तक्रारी वरुन गुन्हा दाखल करण्यात आला व पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांचे मार्गदर्शनाखाली पो. स्टे. नांदेड ग्रामीण येथील गुन्हे शोध पथकातील पोलीस अधिकारी ओमकांत चिंचोलकर, पोलीस निरीक्षक, ज्ञानेश्वर मटवाड पोलीस उप निरीक्षक, सपोउपनि रामकिशन मोरे (त.अं.) पोहेकॉ/ अर्जुन मुडे पोकों/ संतोष पवार पोकों/असीफ अली ,पोकॉ/ गवेंद्र सिरमलवार पोकॉ/ विष्णु कल्याणकर सर्व नेमणुक पो.स्टे. नांदेड ग्रा.व अंमलदार यांनी वरील नमुद गुन्ह्यातील अज्ञात आरोपीतांचा तात्काळ शोध घेत, गोपनीय माहितीचे आधारे सापळा रचून, वर नमुद महिला आरोपीस अवघ्या दोन तासात ताब्यात घेवून, तिच्याकडे कसून चौकशी केली असता तीने गुन्हा केल्याचे कबुल केले व अंध दाम्पत्यांचे चोरलेले दागिने काढून दिल्याने ते जप्त करण्यात आले. सदर फिर्यादी व तिचे पती हे दोघेही अंध असल्याने आरोपी महिलेकडून जप्त करण्यात आलेले सोने कायदेशीर प्रक्रीया करुन तात्काळ फिर्यादी महिला यांना परत करण्यात आले व सदर गुन्ह्याचा जलद गतीने तपास करुन सदर आरोपी महिलेविरुध्द 12 तासाचे आत दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.मा. पोलीस अधीक्षक नांदेड यांनी सदरची कामगिरी करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे अभिनंदन केले आहे.

## पेपर लीक प्रकरणाच्या निषेधार्थ नविन नांदेडमध्ये आंदोलन




नवीन नांदेड : (स. गांवकरी)

देशभरात गाजत असलेल्या निट 26 पेपर लीक प्रकरणाच्या निषेधार्थ आंबेडकर वादी युवक सिडको-हडको नवीन नांदेड यांच्या वतीने शनिवार दि. 16 मे 26 रोजी सकाळी 10 वाजता छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, सिडको नवीन नांदेड येथे जाहीर निषेध आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाद्वारे निट परीक्षेत झालेल्या गैरव्यवहाराची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी,अशी जोरदार मागणी करण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या या प्रकारामुळे देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली असून, केंद्र सरकारने या प्रकरणाची गंभीर दखल घ्यावी, अशी भावना आंदोलकांनी व्यक्त केली. निट 2026 पेपर लिंक " प्रकरणामुळे लाखो विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर पाणी फेरले गेले असून, देशाच्या शिक्षण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे देशाच्या शिक्षण मंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणीही आंदोलकांनी केली.

## अधिक मासानिमित्त आयोजित महिला व उद्योजकांचे प्रदर्शनाचे उद्घाटन

### उद्योजकता प्रदर्शनातून ग्राहकांचा थेट संपर्क व जोडणी : दिपाली बारस्कर

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

अधिक मासानिमित्त प्रतिबिंब संस्थेच्या पुढाकारातून महिला व उद्योजकांसाठी चांगल्या प्रकारे प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे.या प्रदर्शनातून महिला उद्योजकांना प्रोत्साहन मिळते.व नवीन व्यवसाय करण्यासाठी व्यासपीठ खुले झाले आहे.शहराच्या मध्यवर्ती भागात हे प्रदर्शन असल्याने ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळणार आहे. तसेच प्रत्येकाला आपल्या व्यवसायाची ब्रॅण्डिंग करण्यासाठी व मार्केटिंग व प्रचार करण्यासाठी हे प्रदर्शन महत्त्वाचे ठरणार आहे.या उद्योजकता प्रदर्शनातून ग्राहकांचा थेट संपर्क व जोडणी होऊन वर्षभर ग्राहक जोडले जाणार असल्याचे प्रतिपादन महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपाली बारस्कर यांनी केले आहे. अधिकमासानिम्मित १६ व १७ मे रोजी प्रतिबिब संस्थेच्या वतीने अधिक मासा निम्मित महिला व उद्योजकता सक्षमीकरणासाठी शमी गणपती कार्यालय ,दिल्लीगेट येथे सकाळी १० ते रात्री १० यावेळेत प्रदर्शन आयोजित केले असून त्यात शहरासह जिल्ह्यातील२५ महिलांचे स्टोल आहेत. प्रदर्शनाचे उदघाटन महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपाली बारस्कर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी उपसभापती वर्षा सानप, रेणुका महिला मंडळाच्या अध्यक्षा गायत्री कुलकर्णी,संयोजिका अनुजा कांबळे,वनिता मानकर,जयश्री सूळ,ऋतुजा धोत्रे ,प्रिया भागवत आदी उपस्थित होते. दि.१६ व १७ मे या कालावधीत २ दिवसीय प्रदर्शन सर्वासाठी खुले असणार आहे.या प्रदर्शनीत खरेदीसाठी कपडे, ज्वेलरी,लोणचे,पापड, मसाले, कडधान्य,कॉस्मेटिक,किड्स वेअर,फुड स्टॉल,नॅचरोपॅथी, आयुर्वेद,उन्हाळी वाळवण, गृहपयोगी वस्तू आदी बरेच काही स्टोल असणार आहेत. तरी नगरकरांनी एकदा तरी प्रदर्शनाला भेट देऊन व्यवसायिकांना प्रोत्साहन द्यावे.असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.




## अर्धापूर येथे भाजपा युवा मोर्चाची कार्यकारिणी जाहीर



अर्धापूर : (स. गांवकरी)

भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा अर्धापूर तालुक्याच्या नवीन कार्यकारिणीची घोषणा भाजपा युवा मोर्चाचे अध्यक्ष पवन केशव पाटील इंगोले यांनी केली असून, तालुक्या विविध गावांतील युवा कार्यकर्त्यांना पदांची जबाबदारी देण्यात आली आहे.या निवडीमुळे युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या कार्यकारिणीत सरचिटणीसपदी परमेश्वर रोहिदास बंडाळे (गणपूर) व कुश मारोती भांगे यांची निवड करण्यात आली आहे. तसेच उपाध्यक्षपदी हेमंत पंजाब देशमुख (पिंपळगाव), सिद्धार्थ भीमराव गव्हा णे (कामठा), कोंडीबा ज्ञानोबा सूर्यवंशी (भोगाव), रवी अशोक शिंदे (शेणी), संभाजी गंगाधर शिंदे (पाटनूर) व संतोष सुभाषराव कदम (देगाव कु.) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. चिटणीसपदी नरोजी नारायण आढाव (डौर), योगेश उत्तम दुधाटे (पांगरी), प्रसेनजीत राजेश लोणे (लोणी), चिटणीस पदी अंकुश आनंदराव कदम (बामणी) व मुंजाजी नारायण बारसे (उमरी) यांची निवड झाली आहे. तर कोषाध्यक्षपदी अरुण आनंद क्षीरसागर (नांदला) यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी भाजपा युवा मोर्चाचे अध्यक्ष पवन केशव पाटील इंगोले यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण आणि आमदार श्रीजयाताई चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली भाजपा अधिक बळकट करण्यासाठी युवकांनी संघटनात्मक कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा. आगामी काळात गावपातळीवर पक्ष संघटन मजबूत करून युवकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

नवीन कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांचे भाजपा कार्यकर्ते रिकांकडून बॅक अभिनंदन करण्यात येत असून, तालुक्यात पक्ष संघटना अधिक गतिमान होईल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.


## अधिक मासानिमित्त आयोजित महिला व उद्योजकांचे प्रदर्शनाचे उदघाटन

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

- उद्योजकता प्रदर्शनातून ग्राहकांचा थेट संपर्क व जोडणी : दिपाली बारस्कर

अधिक मासानिमित्त प्रतिबिंब संस्थेच्या पुढाकारातून महिला व उद्योजकांसाठी चांगल्या प्रकारे प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे.या प्रदर्शनातून महिला उद्योजकांना प्रोत्साहन मिळते.व नवीन व्यवसाय करण्यासाठी व्यासपीठ खुले झाले आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात हे प्रदर्शन असल्याने ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळणार आहे. तसेच प्रत्येकाला आपल्या व्यवसायाची ब्रॅण्डिंग करण्यासाठी व मार्केटिंग व प्रचार करण्यासाठी हे प्रदर्शन महत्त्वाचे ठरणार आहे.या उद्योजकता प्रदर्शनातून ग्राहकांचा थेट संपर्क व जोडणी होऊन वर्षभर ग्राहक जोडले जाणार असल्याचे प्रतिपादन महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपाली बारस्कर यांनी केले आहे. अधिकमासानिम्मित १६ व १७ मे रोजी प्रतिबिब संस्थेच्या वतीने अधिक मासा निम्मित महिला व उद्योजकता सक्षमीकरणासाठी शमी गणपती कार्यालय ,दिल्लीगेट येथे सकाळी १० ते रात्री १० यावेळेत प्रदर्शन आयोजित केले असून त्यात शहरासह जिल्ह्यातील२५ महिलांचे स्टोल आहेत. प्रदर्शनाचे उदघाटन महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपाली बारस्कर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी उपसभापती वर्षा सानप, रेणुका महिला मंडळाच्या अध्यक्षा गायत्री कुलकर्णी,संयोजिका अनुजा कांबळे,वनिता मानकर,जयश्री सूळ,ऋतुजा धोत्रे ,प्रिया भागवत आदी उपस्थित होते.


## हेरच्या पवित्र भूमीत दरवळणार भक्तिसागर; १०२८ भक्तांचे भव्य गुरुचरित्र पारायण!

नायगाव : (स. गांवकरी)

सिद्ध पुरुष सदगुरू समर्थ संत शिरोमणी बाळगीर महाराज यांच्या पावन जन्मभूमी असलेल्या राहेर नगरीत यंदाच्या गुरुपुष्य अमृत योगानिमित्त अभूतपूर्व धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे. 2028 च्या प्रस्तावित महाकुंभ मेळ्याच्या भव्य तयारीची ही नांदी मानली जात असून, राहेरचे आध्यात्मिक महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित होत आहे. अष्टकौशल्य सन्मानित श्री श्री श्री 1008 महंत नारायणगीर महाराज गुरु बाळगीर महाराज यांच्या प्रेरणादायी संकल्पनेतून तब्बल 1028 भक्तांच्या सहभागाने भव्य गुरुचरित्र पारायणाचे आयोजन करण्यात आले आहे. आदिकमास आणि गुरुपुष्य अमृत योगाचे पवित्र औचित्य साधत होणाऱ्या या धार्मिक उपक्रमामुळे राहेरसह पंचक्रोशीत भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचे अलौकिक वातावरण निर्माण झाले आहे. या दिव्य सोहळ्यात आनंद दत्त पहारा, सायंकाळी विविध गावांतील भक्तांकडून महाराजांचा तुलाभार, रात्री 8 वाजता संत रुद्रगीर महाराज किवळेकर यांच्या ओजस्वी वाणीतून कीर्तन तसेच आनंद दत्त महापूजेचा दिव्य सोहळा रंगणार आहे. हजारो भाविकांसाठी पुरणपोळीच्या धोंडे जेवणाची भव्य व्यवस्था करण्यात आली असून, सेवाभाव आणि भक्तिभावाचा अद्वितीय संगम या निमित्ताने अनुभवायला मिळणार आहे. गतवर्षीही येथे शहादत अवतार सदगुरू समर्थ बाळगीर महाराज यांच्या ग्रंथाचे 1028 भक्तांकडून पारायण, दत्त पहारा, कीर्तन आणि आनंद दत्त महापूजा मोठ्या भक्तिभावात पार पडली होती. याच कार्यक्रमात माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या हस्ते संत निवासाचे भूमिपूजन करण्यात आले होते. त्या वेळी सुरू झालेली विविध धार्मिक व विकासात्मक कामे आजही वेगाने प्रगतीपथावर असून, राहेरच्या आध्यात्मिक वैभवात सातत्याने भर घालत आहेत.



## पिक विमा रोखून शेतकऱ्यांची फसवणूक

### देगलूरमध्ये प्रशासनाविरोधात संतापाचा स्फोट

देगलूर : (स. गांवकरी)

खरीप-2025 चा पिक विमा मंजूर झाल्याच्या घोषणा शासनाकडून मोठ्या गाजावाजात करण्यात आल्या. नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुक्याला सर्वाधिक पिक विमा मंजूर झाल्याचे सांगण्यात आले; मात्र प्रत्यक्षात मरखेल, देगलूर आणि खानापूर महसूल मंडळातील अनेक शेतकऱ्यांच्या खात्यात आजतागायत एक रुपयाही जमा न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. याच पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाचे जिल्हा प्रवक्ते तथा शेतकरी नेते कैलास येसगे कावळगावकर यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी उपजिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत जोरदार धरणे आंदोलन छेडले. "उर्वरित शेतकऱ्यांचा पिक विमा तात्काळ जमा करा, अन्यथा उग्र स्वरूपाचे आंदोलन उभारले जाईल," असा आक्रमक इशारा प्रशासनाला देण्यात आला. आंदोलनादरम्यान कृषी विभाग, महसूल प्रशासन आणि विमा कंपनीच्या प्रतिनिधींना सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात उर्वरित शेतकऱ्यांचा पिक विमा तात्काळ अदा करावा, तसेच खरीप हंगामासाठी लागणारे खतं-बियाणे योग्य दरात उपलब्ध करून द्यावेत, अशी ठाम मागणी करण्यात आली. शेतकऱ्यांचा वाढता आक्रोश लक्षात घेऊन नायब तहसीलदार विलास तेलंग यांनी पुढाकार घेत कृषी अधिकारी एम. जी. सोनकांबळे व विमा कंपनीच्या प्रतिनिधींसोबत तातडीची बैठक घेतली. या बैठकीत पुढील आठवडाभरात पिक विमा वितरित करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती देण्यात आली. या आंदोलनात कैलास येसगे कावळगावकर यांच्यासह जयदीप वरखिंडे, महेश पाटील अल्लापूरकर, भरत पाटील, अरविंद देशमुख, व्यंकट पाटील झरीकर, उमेश पाटील आडलूरकर, भास्कर पाटील, मुन्ना पाटील भोकसखेडकर, भागवत पाटील सोमूरकर, विलास रेड्डी यालावार, निशिकांत कांबळे, दिलीप मरकंटे, सुभाष अल्लापुरकर, यादवराव बोरगावकर, गोपाळ मोरे, सुर्याजी पाटील भक्तापूरकर, सुधाकर जबडे, बाळासाहेब बाबरे, श्रीपत बोडके, सुनील शिंदे, योगेश थडके, बालाजी पाटील डुकरे, गोविंद कोठारे, विठ्ठलराव भोसले, बालाजी वळंकीकर, बंडू बिरादार, शिवलिंग येसगे, बसवंत पटणे, शिवाजी बिरादार, माधव लगडे, सदाशिव वरखिंडे, नंदकिशोर पाटील, प्रशांत पाटील, शादुल पटेल, माधव पाटील, रामराव मोरे, बळीराम बामणे, मारुती पाशमवार, सुभाष वद्देवार यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.



# थोडक्यात पण महत्वाचे

## हॉटेल उद्योगात मनुष्यबळाची तीव्र कमतरता



पिंपरी-चिंचवड (स. गांवकरी) : भारतातील हॉस्पिटॅलिटी (आतिथ्य) क्षेत्र झपाट्याने विस्तारत असताना, हॉटेल उद्योगाला प्रवेश-स्तरीय प्रशिक्षित मनुष्यबळाची मोठी कमतरता जाणवत आहे. भरतीतील तूट, उच्च ॲट्रिशन (कामगार गळती) आणि तात्काळ कामासाठी तयार उमेदवारांची गरज लक्षात घेता, 'डायरेक्ट प्लेसमेंट' आधारित हॉस्पिटॅलिटी व्होकेशनल डिप्लोमा पाथवे हा प्रभावी आणि व्यावहारिक पर्याय म्हणून पुढे येत आहे. हॉस्पिटॅलिटी क्षेत्रात केवळ व्यवस्थापक किंवा वरिष्ठ तज्ज्ञांचीच नव्हे, तर शिस्तबद्ध, सेवा-केंद्रित आणि ऑपरेशन्सशी पटकन जुळवून घेणाऱ्या प्रवेश-स्तरीय कर्मचाऱ्यांची मोठी गरज असते. विविध बाजारपेठांमध्ये कुशल-अकुशल श्रेणीत 30 ते 40 टक्क्यांपर्यंत मनुष्यबळाची कमतरता जाणवत असल्याने उद्योग असंघटित भरतीऐवजी संरचित वर्कफोर्स पाइपलाइनकडे वेगाने वळत आहे. पारंपरिक "प्रथम प्रशिक्षण, नंतर नोकरी" या पद्धतीऐवजी, या मॉडेलमध्ये उमेदवारांना सुरुवातीपासूनच प्रत्यक्ष हॉटेलमध्ये कामाची संधी मिळते. उमेदवार थेट नोकरीला सुरुवात करतात आणि त्याचवेळी ग्रूमिंग, वर्कप्लेस रेडीनेस (कामाच्या ठिकाणी तयारी) तसेच संरचित व्होकेशनल डिप्लोमा फ्रेमवर्क अंतर्गत टप्प्याटप्प्याने प्रगती करतात. त्यामुळे उद्योगाला तात्काळ उपयुक्त कर्मचारी मिळतात आणि उमेदवारांना प्रत्यक्ष अनुभवासह करिअरची मजबूत दिशा मिळते. या पाथवे कार्यक्रमात उमेदवारांची ओळख व ऑनबोर्डिंगनंतर संवाद कौशल्य, व्यावसायिक शिस्त, सेवा-दृष्टिकोन, ग्रूमिंग मानके, हॉस्पिटॅलिटी वर्तनशैली यावर विशेष भर दिला जातो. त्यानंतर उमेदवारांना प्रत्यक्ष हॉटेल भूमिकांमध्ये प्लेसमेंट दिले जाते, ज्यामुळे त्यांना वास्तविक ऑपरेशनल अनुभव मिळून आवश्यक कौशल्ये आणि व्यावसायिक सवयी प्रत्यक्ष कामातून विकसित होतात. अधिक माहितीसाठी या नंबरवर कॉल / व्हाट्स अँप 9769559855 / 9769761099 संपर्क साधावा.

## पाल येथे तापमानाचा पारा ४४ अंशावर

रावेर (स. गांवकरी) : जळगाव जिल्ह्यांतील व माहाराष्ट्रातील थंड हवेचे ठिकाण म्हणून सातपुडयाच्या तिसऱ्या कुशीत वसलेल्या पालची आज सर्वत्र ओळख आहे . परंतू पालचा तपमानाचा पारा ४४ अंशांच्या वर गेल्याने , तसेच या भागात प्रचंड प्रमानात झालेली जंगलतोड , व शासन दरवर्षी जुनमध्ये कोट्यावधीचा निधी वृक्ष लागवडी साठी खर्च करीत असते परंतु त्यामानाने या भागात न झालेली वृक्षलागवड तपमानाचे कारण सांगितले जात आहे. पुर्वी शालेय अभ्यास क्रमतील भुगोलाच्या पाठयपुस्तकात पाल हे थंड हवेचे ठिकाण म्हणुन , त्याचीओळख होती. सातपुडयाच्या तिसर्या पर्वत रांगामध्ये हे गाव वसलेले असून , मध्ये प्रदेश माहाराष्टाच्या सिमेलगत आहे . १० मेला ३९डिग्री सेल्स अ ११ मे ला ४० डिग्री सेल्स १२ मे ला ४१ डिग्री सेल्स १३ मे ला ४१ . ६ सेल्स आणि आज १४ मे ला जवळपास ४२ डिग्री सेल्स पर्यंत तसेच १५ मे ला तप मानाचा पारा४४ पर्यंत गेला असल्याचे सांगण्यात येत आहे. याला मोठ्या प्रमाणात झालेली वृक्षतोड सांगितली जात आहे. काही प्रमाणात वृक्ष लागवड झाली असलीतरी त्यात बोगस लावड जास्तीची दाखवली गेल्या चे दबक्या आवाजात बोलले जात आहे. केंद्र सरकार माहाराष्ट शासन दरवर्षी जुन मध्ये वृक्ष लागवडीसाठी कोट्यावधी रुपये खर्च करते परंतु त्याचा फायदा किती होतो आणि खर्च कुठे जातो ? अशी अनेक प्रश्न अनुत्तरीत आहेत.

## अमनोराचा शंभर टक्के निकाल



पुणे (स. गांवकरी) : पुण्यातील अमनोरा विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सीबीएसई बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाने यंदा शंभर टक्के निकालाची नोंद केली असून विज्ञान, वाणिज्य आणि मानवविद्या शाखांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. विज्ञान शाखेत अभिनंदन जिनेंद्र पाटील यांनी ९०.६ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला. वाणिज्य शाखेत आस्था महाजन हिने ९६.६ टक्के गुणांसह अव्वल स्थान पटकावले, तर मानवविद्या शाखेत तेजस्वी खानवॉकर हिने ९६.६ टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश मिळवले. विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची मेहनत, सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचा पाठिंबा असल्याचे विद्यालय प्रशासनाने सांगितले. शैक्षणिक गुणवत्ता आणि सर्वांगीण विकास यांचा समतोल साधत विद्यार्थ्यांना सक्षम घडविण्याचे कार्य विद्यालय सातत्याने करत असल्याचेही प्रशासनाने नमूद केले. विद्यालयाच्या संचालिका मीरा नायर म्हणाल्या, "बारावी मंडळ परीक्षेत विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाचा आम्हाला अत्यंत अभिमान आहे विद्यार्थ्यांनी समर्पण, शिस्त आणि गुणवत्तेचे उत्कृष्ट उदाहरण सादर केले आहे. शंभर टक्के निकालासह अव्वल विद्यार्थ्यांनी ९६.६ टक्के गुण मिळवले आहेत. हे यश विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्या संयुक्त प्रयत्नांचे फलित आहे." विद्यालयाच्या या यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## संतूर लाईमची नवीन टीव्ही जाहिरात लाँच




बेंगळुरू (स. गांवकरी) : विप्रो कंझ्युमर केअर अँड लाइटिंगचा प्रमुख ब्रँड असलेल्या संतूरने संतूर लाइम साबणासाठी नवीन टीव्ही जाहिरात लाँच केली आहे. ही जाहिरात आजच्या व्यस्त दिनचर्येत दररोज स्वतःला पुन्हा ताजेतवाने आणि रिचार्ज करण्याच्या कल्पनेवर आधारित आहे. "3x फ्रेशनेस" या आश्वासनासह हा साबण प्रत्येक वापरानंतर दीर्घकाळ ताजेपणाची अनुभूती देतो. संतूर लाइम साबणामध्ये लिंबू, एलोवेरा आणि मेंथॉल यांचे मिश्रण आहे, ज्यामुळे थंडावा देणारा आणि ताजेतवाना करणारा आंघोळीचा अनुभव मिळतो. टिल्ट ब्रँड सोल्युशन्सने संकल्पित केलेली ही टीव्ही जाहिरात एका शिक्षिकेची कथा दाखवते, जी एक आईसुद्धा आहे. ती शाळा आणि घर या दोन्ही जबाबदाऱ्या सांभाळते. दिवसभराच्या धावपळीत ती थकलेली दिसते, तिच्यावरचा ताण जाणवू लागतो, पण थोडी विश्रांती मिळाल्यानंतर तिचा मूड बदलतो. त्यानंतर संतूर लाइम साबणाने आंघोळ केल्यानंतर ती पूर्णपणे "100% रिचार्ज" झाल्यासारखी ताजेतवानी होते आणि पुन्हा उत्साहाने आपले काम पुढे सुरू करते. या मोहिमेबद्दल बोलताना, एस. प्रसन्ना राय, चीफ मार्केटिंग ऑफिसर, विप्रो कन्झ्युमर केअर म्हणाले, "लिंबू, एलोवेरा आणि मेंथॉल या तीन घटकांचे फायदे एकत्र करून आम्ही साबणाचा फ्रेशनेस अनुभव अधिक चांगला आणि ताजेतवाना केला आहे. यामुळे आंघोळ केल्यानंतर शरीराला अधिक ताजेतवाने वाटते. ही मोहीम थकलेल्या अवस्थेतून पुन्हा उत्साहाने दिवसाला सामोरे जाण्याचा नैसर्गिक अनुभव दाखवते.

## भारती एअरटेलची चौथ्या तिमाहीत मजबूत कामगिरी

पुणे (स. गांवकरी) : भारती एअरटेल लिमिटेडने मार्च 2026 अखेरच्या चौथ्या तिमाहीत मजबूत आर्थिक कामगिरी नोंदवली. कंपनीचा एकत्रित महसूल 55,383 कोटी रुपये झाला असून त्यात वार्षिक 15.7 टक्के वाढ झाली आहे. भारतातील मोबाईल व्यवसायात चांगली वाढ झाली असून एआरपीयू 257 रुपयांपर्यंत पोहोचला आहे. याशिवाय, कंपनीने या तिमाहीत 2,426 नवीन टॉवर्स आणि 16,746 मोबाईल ब्रॉडबँड बेस स्टेशन उभारले. तसेच एअरटेलने 65 कोटी ग्राहकांचा टप्पा पार करत जगातील दुसऱ्या क्रमांकाची टेलिकॉम कंपनी म्हणून आपले स्थान अधिक मजबूत केले आहे.

# ग्रामीण भागातून शहराला जोडणाऱ्या रस्त्यांची अक्षरश: चाळणी

## सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कारभारावर नागरिकांत संताप

### धावरी फाटा ते कलंबर मार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य; पावसाळ्यापूर्वी तातडीने दुरुस्तीची मागणी

लोहा : (स. गांवकरी)

लोहा तालुक्यातील ग्रामीण भागातून शहराला जोडणाऱ्या प्रमुख आणि वर्दळीच्या रस्त्यांची सध्या अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. मार्गावर सर्वत्र खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असून, रस्त्याची अक्षरशः चाळणी झाली आहे. यामुळे वाहनचालकांसह सर्वसामान्य नागरिकांना दररोज मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः लोहा–कंधार मार्गावरून धावरी फाटा ते कलंबर (राष्ट्रीय महामार्ग ५१) ला जोडणाऱ्या अंतर्गत रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट आहे. रस्त्यावरील मोठमोठ्या खड्ड्यांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून, या परिस्थितीमुळे ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भोंगळ कारभारावर तीव्र संताप व्यक्त केला आहे.



हा मार्ग परिसरातील अनेक गावांसाठी अत्यंत महत्त्वाचा दुवा आहे. धावरी, रायवाडी, मलकापूर, पानभोसी, चिखलभोसी यांसह परिसरातील अनेक गावांना लोहा शहराशी जोडणारा हा मुख्य मार्ग आहे. दररोज शेकडो नागरिक, शाळेत जाणारे विद्यार्थी, शेतमाल बाजारात घेऊन जाणारे शेतकरी आणि व्यापारी याच रस्त्याचा वापर करतात. मात्र, गेल्या अनेक महिन्यांपासून रस्त्याची कमालीची दुरवस्था झाली आहे. ठिकठिकाणी पडलेल्या जीवघेण्या खड्ड्यांमुळे दुचाकीस्वारांना जीव मुठीत धरून कसरत करत प्रवास करावा लागत आहे. अनेक ठिकाणी रस्त्याची खडी पूर्णपणे उखडली असून रस्ता खचला आहे. वाहनांच्या वर्दळीमुळे उडणाऱ्या प्रचंड धुळीमुळे प्रवाशांसह आजूबाजूच्या ग्रामस्थांच्या आरोग्याचा आणि श्वसनाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. खड्ड्यांचा अंदाज न आल्याने दुचाकी घसरून अपघात होण्याच्या घटना सातत्याने घडत आहेत.

आता अवघ्या काही दिवसांवर पावसाळा येऊन ठेपला आहे. पावसाळ्याच्या दिवसांत या खड्ड्यांमध्ये पाणी साचल्यास वाहनचालकांना खड्ड्यांचा अंदाज येणार नाही. परिणामी, रस्त्यांची स्थिती आणखीच भयावह आणि धोकादायक होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ग्रामस्थांनी वेळोवेळी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि प्रशासनाकडे तक्रारी करूनही या समस्येकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप होत आहे. प्रशासनाच्या या उदासीनतेमुळे नागरिकांचा संयम आता सुटत चालला आहे.

दरम्यान, लोहा–कंधार मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे. आमदारांनी संबंधित विभागाला तात्काळ रस्ता दुरुस्तीचे व डांबरीकरणाचे आदेश द्यावेत, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. ग्रामीण भागातील जनतेला सुरक्षित प्रवासासाठी पावसाळ्यापूर्वी युद्धपातळीवर खड्डेमुक्ती मोहीम राबवावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही संतप्त नागरिकांनी दिला आहे.

### सार्वजनिक बांधकाम विभागाचा कारभार जिल्ह्यावरून

लोहा तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाचा कारभार प्रत्यक्ष ग्राउंडवर न चालता नांदेड जिल्हा मुख्यालयावरूनच सुरू असल्याची नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. तालुक्यातील अनेक प्रमुख व ग्रामीण रस्त्यांची अक्षरशः चाळणी झाली असून ठिकठिकाणी खड्ड्यांमुळे वाहनधारक व नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. वारंवार तक्रारी करूनही संबंधित उपअभियंता व प्रशासनाकडून दुरुस्तीकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. पावसाळ्यापूर्वी रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करून सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रत्यक्ष पाहणी करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# "चेक टुडे फॉर अ बेटर टुमॉरो" रेड बलून मोहिमेचे आयोजन

पुणे : (स. गांवकरी)

जागतिक उच्च रक्तदाब दिनानिमित्त रुबी हॉल क्लिनिक तर्फे "चेक टुडे फॉर अ बेटर टुमॉरो" या अनोख्या जनजागृती मोहिमेचे आयोजन करण्यात आले. वाढत्या उच्च रक्तदाबाच्या समस्येबाबत जनजागृती करणे आणि नियमित रक्तदाब तपासणीचे महत्त्व अधोरेखित करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. या मोहिमेअंतर्गत रुबी हॉल क्लिनिकच्या परिसरात १० फूट उंचीची "रेड बलून वॉल" उभारण्यात आले होते . यावेळी डॉ. परवेझ ग्रँट, डॉ. सायमन ग्रँट, रुबी हॉल क्लिनिकचे समूह मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मुदित सक्सेना, मुख्य कामकाज अधिकारी श्री. उर्वाक्ष भोट, वैद्यकीय संचालक डॉ. विवेक लाल, न्युरो-इंटेन्सिव्ह केअर युनिटचे प्रमुख डॉ.कपिल झिरपे तसेच मेडिसिन विभागाच्या प्रमुख डॉ. निर्मला कॅस्टेलिनो उपस्थित होते. उच्च रक्तदाब हा भारतातील



सर्वात गंभीर आणि कुठल्याही ठोस लक्षणांशिवाय वाढणाऱ्या आरोग्य समस्यांपैकी एक मानला जातो. जागतिक आरोग्य संघटनेच्या भारतातील आकडेवारीनुसार, सुमारे २२ कोटी भारतीय उच्च रक्तदाबाने ग्रस्त आहेत; मात्र त्यापैकी केवळ १२ टक्के रुग्णांचा रक्तदाब नियंत्रणात आहे. सार्वजनिक आरोग्याशी संबंधित अंदाजानुसार, भारतातील प्रत्येक चार प्रौढांपैकी एक व्यक्ती उच्च रक्तदाबाने प्रभावित आहे. यामुळे हृदयविकाराचा झटका, स्ट्रोक, मूत्रपिंडाचे आजार आणि अकाली मृत्यूचा धोका मोठ्या प्रमाणात वाढतो.

# ३० हजार कष्टकऱ्यांचे १८० कोटी अडकले; ठेवीदारांवर उपासमारी

## सेनापती बापट मल्टिस्टेट फसवणूक प्रकरण: पारनेरच्या ठेवीदारांचे पालकमंत्री विखे पाटील यांना निवेदन; उपोषणाचा इशारा

पारनेर : (स. गांवकरी)

सेनापती बापट मल्टिस्टेट को -ऑपरेटिव्ह सोसायटीने पारनेर तालुक्यातील सुमारे ३० हजार ठेवीदारांची १८० कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी संतापलेल्या ठेवीदारांनी शनिवारी पारनेर दौऱ्यावर असलेल्या जिल्ह्याचे पालकमंत्री व जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेतली. ठेवीदारांनी विखे पाटील यांना सविस्तर निवेदन देऊन या प्रकरणातील संथ पोलीस तपासाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली, तसेच दोषींवर कडक कारवाई न झाल्यास उपोषणाचा इशारा दिला आहे. या प्रसंगी एकनाथ औटी, काकासाहेब काळे, संपत चेडे, निलेश गाडगे, अजय औटी, महदू लोळगे, राजेंद्र गवळी, पंढरीनाथ साळवे आणि ॲड. ऋषिकेश शिंदे आदी प्रमुख ठेवीदार व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ठेवीदारांनी दिलेल्या निवेदनानुसार, सेनापती बापट पतसंस्थेच्या चेअरमन,



कार्यकारी अधिकारी, संचालक मंडळ आणि व्यवस्थापकांवर ११ जून २०२५ रोजी पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ४६३/२०२५ अंतर्गत 'एमपीआयडी' कायदा आणि भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हा सत्र न्यायालयाने सर्व आरोपींचे अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळले होते. मात्र, त्यानंतर आरोपींनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात धाव घेतली. पोलीस प्रशासनाने उच्च न्यायालयात ठेवीदारांची बाजू योग्य पद्धतीने मांडली नसल्यामुळेच मुख्य आरोपींना अंतरिम जामीन मिळाला असून, शेकडो कोटी रुपये गडप करून आरोपी आज उजळ माथ्याने फिरत असल्याचा थेट आरोप ठेवीदारांनी केला आहे. पतसंस्थेच्या २९ शाखांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी आणि वृद्धांनी आपल्या घामाचा पैसा या पतसंस्थेत ठेवला होता. संस्थेच्या २०२३-२४ च्या ऑडिट रिपोर्टनुसार ही मुद्दल रक्कम तब्बल १८० कोटी ३५ लाख रुपये इतकी आहे. ठेवींची मुदत संपूनही ठेवीदारांना अद्याप एकही रुपया परत मिळालेला नाही. या आर्थिक संकटामुळे अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली असून त्यांचे भविष्य अंधारात सापडले आहे. पोलीस अधीक्षक कार्यालयाशी वारंवार पत्रव्यवहार करूनही कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याचे त्यांनी सांगितले. या गंभीर प्रकरणात फरार आणि जामिनावर असलेल्या सर्व आरोपींना तातडीने अटक करण्याची मागणी ठेवीदारांनी केली आहे. तसेच पतसंस्थेचे तातडीने 'फॉरेन्सिक ऑडिट' करून अपहाराची अचूक रक्कम निश्चित करावी, 'एमपीआयडी' कायद्यानुसार पतसंस्थेच्या नावावरील व आरोपींच्या वैयक्तिक सर्व मालमत्ता तातडीने जप्त कराव्यात आणि मालमत्तांचे बेकायदेशीर हस्तांतरण रोखावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

# राष्ट्रीय डेंग्यू दिवस : भारतातील शहरे डेंग्यूची हॉटस्पॉट

नवी दिल्ली : (स. गांवकरी)

मान्सूनपूर्व प्रतिबंधात्मक उपक्रमांना सुरुवात करताना दरवर्षी १६ मे रोजी देशभरात राष्ट्रीय डेंग्यू दिन साजरा केला जातो. डेंग्यूला प्रतिबंध करण्यासाठी व्यक्ती, कुटुंबे आणि समुदाय या सर्वांकडून सातत्यपूर्ण प्रयत्नांची आवश्यकता असते, याचे हे एक स्मरण असते. यंदा वाढते तापमान आणि बदलत्या हवामनामुळे संपूर्ण भारतात डेंग्यूचा धोका अधिक आहे. त्यामुळे हे स्मरण पूर्वीपेक्षा अधिक महत्त्वाचे ठरते.

भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) असा अंदाज वर्तवला आहे की, २०२६ मध्ये देशाच्या मोठ्या भागांमध्ये सामान्यपेक्षा जास्त तापमान आणि उष्णतेच्या लाटेचे अधिक दिवस अनुभवायला मिळतील. त्यामुळे हे वर्ष आतापर्यंतच्या सर्वात उष्ण वर्षांपैकी एक ठरण्याची शक्यता आहे. जगभरातील शास्त्रज्ञांनी असा इशाराही दिला आहे की एल निनोसारख्या हवामान पद्धतींमुळे



तीव्र हवामान घटना अधिक घतक होऊ शकतात आणि रोगराईचा धोका वाढेल. अशा परिस्थितीमुळे डेंग्यूचा धोका वाढण्याची शक्यता आहे, कारण जास्त तापमानामुळे कीटकजन्य रोगांच्या प्रसारासाठी अनुकूल वातावरण निर्माण होते. त्याचा परिणाम म्हणून भारतीय शहरे डेंग्यूच्या प्रसारासाठी प्रमुख हॉटस्पॉट म्हणून उदयास येत आहेत.

डेंग्यू आता केवळ पावसाळ्यापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर ती आता वर्षभरातील सार्वजनिक आरोग्यासाठी चिंतेची बाब बनली आहे. पारंपरिक हंगामी उच्चांकानंतरच्या काळातही रुग्ण आढळून येत आहेत. वेगाने होणारे शहरीकरण, वाढते तापमान आणि बदलणारे हवामान डेंग्यूच्या प्रसाराला गती देत आहेत. याव्यतिरिक्त लोकसंख्येची उच्च घनता, अनियोजित बांधकाम आणि पाणी साठवण्याच्या पद्धती यांसारखे घटक डासांच्या प्रजननासाठी आदर्श परिस्थिती निर्माण करत आहेत.

जगभरातील डेंग्यूच्या एकूण रुग्णांपैकी जवळपास एक तृतीयांश रुग्ण भारतात आहेत आणि मागील दोन दशकांत त्याचा प्रसार अकरा पटीने वाढला आहे. डेंग्यू भारताच्या बहुतेक भागांमध्ये दिसून येतो आणि त्यामुळे ठराविक कालावधीत वार्षिक उद्रेक होतो. त्यात जवळपास प्रत्येक प्रदेशातून रुग्ण आढळतात. आता भारताच्या दक्षिण आणि पश्चिम भागांमध्ये तो बारमाही (वर्षभर) झाला आहे.

आता पारंपरिक पावसाळ्याच्या महिन्यांव्यतिरिक्त इतर काळातही आणि पूर्वी कमी धोका असलेल्या भागांमध्येही याची नोंद होत आहे. त्यात हिमाचल प्रदेश आणि ईशान्य भारतातील काही भागांसारख्या उंच प्रदेशांचा समावेश आहे. धोक्याची पातळी आणखी वाढण्याची शक्यता आहे, कारण २०५० पर्यंत अंदाजे १.५ अब्ज भारतीय डेंग्यूच्या धोक्याच्या क्षेत्रात राहतील असा अंदाज आहे. डेंग्यू सर्व वयोगटातील लोकांना होऊ शकतो; तथापि, काही विशिष्ट गटांना डेंग्यूचा जास्त धोका असतो. १५ वर्षांखालील मुलांमध्ये रुग्णांची संख्या जास्त असते आणि त्यांची रोगप्रतिकारशक्ती विकसित होत असल्यामुळे त्यांना डेंग्यूचा धोका जास्त असतो. मधुमेह, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा आणि हृदयरोग यांसारखे आजार असलेल्या प्रौढांमध्येही गुंतागुंत होण्याची शक्यता जास्त असते. याशिवाय, भारतात डेंग्यूचे चारही प्रकार प्रचलित आहेत. याचा अर्थ व्यक्तीला अनेक वेळा संसर्ग होऊ शकतो, आणि दुसऱ्यांदा होणाऱ्या संसर्गामुळे अनेकदा आजार अधिक गंभीर होतो व रुग्णालयात दाखल होण्याचा धोका वाढतो.

# महाराष्ट्रातील वीज वितरण व्यवस्थेत सुधारणा करण्याची गरज

पुणे : (स. गांवकरी)

पुण्यातील सदाशिव पेठ परिसरात अलीकडे 25 तास वीज खंडित राहिली. ही समस्या एमएसईडीसीएलच्या एका युनिटमधील उपकरणांवर अतिउष्णतेचा परिणाम झाल्यामुळे निर्माण झाली. जास्त उष्णतेमुळे उपकरणे जास्त गरम झाली आणि महत्त्वाच्या भागांचे नुकसान झाले, ज्यामुळे आग लागली. या घटनेमुळे 5,500 पेक्षा जास्त ग्राहक प्रभावित झाले. तीव्र उष्णतेच्या लाटेत अनेक घरांमध्ये वीज नसल्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला. ही एकमेव घटना नाही. पुण्यातील वानवडी, शांतिनगर आणि जगताप चौक या भागांमध्ये अलीकडे फीडर दुरुस्तीसाठी सुमारे सहा तास नियोजित वीज खंडित करण्यात आली होती. तसेच नागपूरमध्ये 873 मेगावॅटच्या विक्रमी मागणीमुळे वारंवार वीज

■ वारंवार होणाऱ्या खंडित वीजपुरवठ्यामुळे व्यवस्थेतील त्रुटी समोर येत आहे

ट्रिप होणे आणि दीर्घकाळ वीज खंडित राहण्याच्या घटना घडल्या. वीज पुरवठ्यातील अशा प्रकारच्या कपातीमुळे लोकांच्या दैनंदिन जीवन आणि व्यवसायांवर गंभीर परिणाम होत आहे. वीज नसल्यामुळे हजारो नागरिकांना पंखे आणि एसीशिवाय तीव्र उष्णतेचा सामना करावा लागतो. तसेच रुग्णालयांना आवश्यक सेवा सुरू ठेवण्यात अडचणी येतात आणि लहान व्यवसायांना आर्थिक नुकसान सहन करावे लागते. परिणामी, अशा अडथळ्यांमुळे सामान्य लोकांच्या जीवनात ताण वाढतो आणि वीज सेवा पुरवणाऱ्या सार्वजनिक संस्थांवरील त्यांचा विश्वासही कमी होतो.

# पिंपळाच्या पुनर्स्थापनेतून उभी राहिली 'ट्री आर्मी'

## सांगलीत हरित लोकचळवळीला मोठा प्रतिसाद

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

"कोणतेही पिंपळाचे झाड तोडू नये, त्याऐवजी त्याची पुनर्स्थापना करावी," या विचारातून सुरू झालेला उपक्रम आज हजारो सांगलीकरांच्या सहभागाने उभ्या राहिलेल्या 'ट्री आर्मी'पर्यंत पोहोचला असल्याचे मत आमदार सुहास बाबर यांनी व्यक्त केले. सांगली जिल्ह्यात सुरू असलेल्या या हरित लोकचळवळीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, पर्यावरण संवर्धनासाठी मोठ्या प्रमाणावर लोक सहभागी होत आहेत.

सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यात एका वेगळ्या प्रकारची हरित चळवळ उभी राहत असून, या उपक्रमाचे नेतृत्व आमदार सुहास बाबर करत आहेत. आडवाटेवर वाढलेल्या पिंपळाच्या झाडाची तोड न करता त्याचे पुनर्वसन करण्याच्या संकल्पनेतून या मोहिमेची सुरुवात झाली. आज या उपक्रमाचे रूपांतर हजारो नागरिकांच्या सहभागातून "ट्री आर्मी"मध्ये झाले आहे.

येत्या ५ जून रोजीच्या वसुंधरा दिनानिमित्त वड, पिंपळ, बहावा, करंज आणि चिंच यांसारख्या डेरेदार वृक्षांची मोठ्या प्रमाणावर लागवड सुरू आहे. या वृक्षांच्या संगोपनासाठी "ट्री आर्मी" कटिबद्ध असून, व्यापारी संघटना, संस्था आणि विविध क्षेत्रातील नागरिक उत्साहाने सहभागी होत असल्याचे त्यांनी सांगितले. नोकरी किंवा व्यवसायानिमित्त गावापासून दूर राहणाऱ्या नागरिकांनी पुन्हा आपल्या मातीत जोडले जावे आणि या हरित चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन आमदार सुहास बाबर यांनी केले.

दिवंगत आमदार अनिलभाऊ बाबर हे मातीशी नाळ जोडलेले नेते म्हणून ओळखले जात होते. टेंभू योजनेचे जनक म्हणूनही त्यांचा उल्लेख केला जातो. त्यांच्या पश्चात राजकीय वारसा सांभाळणाऱ्या सुहास बाबर यांनी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या ७८ हजार १७८ मताधिक्याइतकी झाडे मतदारसंघात लावण्याचा संकल्प केला असल्याचे सांगितले.

समाज माध्यमांवर "पिंपळाची गोष्ट" प्रसारित झाल्यानंतर या मोहिमेला मोठा प्रतिसाद मिळाला. हजारो नागरिक स्वयंप्रेरणेने या चळवळीत सहभागी होत असून, जागा उपलब्ध करून देणे, पाणी, झाडे आणि श्रमदान अशा स्वरूपात मदत करत आहेत. "ट्री आर्मी" हे नावही नागरिकांनीच दिल्याचे बाबर यांनी सांगितले.

आपल्या मातोश्रींच्या श्राद्धदिनी ५ हजार ३०० आंब्यांची कलमे रुजवण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच विटा नगरपालिकेतील एका नगरसेवकाने चार वर्षांची वाढ झालेली ५२ झाडे भेट दिली, तर आळसंद ग्रामपंचायतीने ५०० झाडांचे रोपण केले असल्याचे त्यांनी नमूद केले.

सांगली जिल्हा प्रशासन आणि वन विभागाच्या माध्यमातून एका एकर जागेत जपानी पद्धतीचे "मियावकी जंगल" विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. गायरान जमिनीवर आणि रस्त्यालगत नैसर्गिकरित्या वाढणाऱ्या वृक्षांची लागवड करण्याचा उपक्रम सुरू असून, पूर्वी जिल्ह्यातील रस्त्यांवर असलेली हिरवी बोगदे पुन्हा निर्माण करण्याचे ध्येय असल्याचे बाबर यांनी सांगितले.